# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

प्रवेश सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ४५५
दिनांक : 10 MAY 2017

**विषय** :- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या तंत्रशिक्षणाशी संबंधित व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमांच्या प्रसिध्दीबाबत...

शासनाने महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक१७.८.२०१५लागू केला व यामधील तरतूदीनुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांचे एक खिडकी पध्दतीने सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश करण्याचे शासनाचे धोरण आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी अर्हता, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीचे प्रवेश नियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०२,१०३,१०४ आणि १०५ अन्वये दिनांक २४.४.२०१७ रोजी प्रसिध्द केलेले आहेत.

तसेच शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम- २०१६/ प्र.क्र ४७३/१६)/ तांशि-४, दिनांक २५.४.२०१७ अन्वये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय /अशासकीय अनुदानीत व विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्हता, शर्ती आणि सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम लागू केलेले आहेत.

उपरोक्त प्रवेश नियम आणि शासन निर्णय संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या तंत्रशिक्षणाशी संबंधित व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी, पालक,संस्था आणि इतर संबंधित घटकांनी याची नोंद घ्यावी.

( **चंद्रशेखर ओक,** भा.प्र.से)
संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\Budage\२०१७-१८\Notifications\admission rules notice to all.docx